**लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, जळगांव**

- Email ID : cadajalgaon@gmail.com
  seacada.jalgn@wrd.maharashtra.gov.in
- दूरध्वनी : 0257- 2235880,
- फॅक्स : 0257-2239845
- गिरणा भवन, आकाशवाणी केंद्रासमोर,
- आकाशवाणी चौक, जळगांव
- Web : www.cada-jalgaon.org

---

**ई-मेल**

जा.क्र./कडा/आ-१/ ३८२४ /२०२१
लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, जळगांव
दिनांक :- १६/ ११/२०२१

प्रति,

अधीक्षक अभियंता,
ई प्रशासन मंडळ,
पुणे.

विषय:- सेवानिवृत्त तांत्रिक अधिकारी यांच्या सेवा करार पध्दतीने विवक्षीत कामासाठी घेणेबाबत..

संदर्भ: - १.शासन निर्णय क्र.संकीर्ण -२७१५/प्रक्र.१००/१३ दिनांक १७/१२/२०१६
२) प्राधिकरण कार्यालयाचे पत्र क्र. कडा/आ-१/१२६४, दिनांक १५/०४/२०२१
३) मु.अ.तापाविम,जळगाव या कार्यालयाचे पत्र जा.क्र.प्रशा/व्यव/४७२८ दि.२६/१०/२०२१

संदर्भीय शासन निर्णयानुसार कनिष्ठ अभियंता/शाखा अभियंता/सहाय्यक अभियंता श्रेणी-२ या पदासाठी विवक्षीत कामांसाठी कंत्राटी पध्दतीने ९ सेवानिवृत्त अभियंता यांची कंत्राटी पध्दतीने नेमणूक करण्याबाबत संदर्भ क्र.३ नुसार मान्यता प्राप्त झालेली आहे.

शासन निर्णयानुसार कनिष्ठ अभियंता/शाखा अभियंता/सहाय्यक अभियंता श्रेणी-२ या पदासाठी विवक्षीत कामांसाठी कंत्राटी पध्दतीने ९ सेवानिवृत्त अभियंता यांची नेमणूक करणेबाबतची जाहीरात सोबत ईमेलने PDF व Scan स्वरूपात पाठविण्यात येत आहे.

कृपया सदर जाहिरात हि **दिनांक- २२ /११ /२०२१** रोजी सकाळी ११.०० वाजता जलसंपदा विभाग, शासनाचे संकेतस्तळावर (www.wrd.maharashtra.gov.in) यावर प्रसिद्ध करण्यात यावी ही विनंती.

हे आपले माहिती व कार्यवाहीस्तव सस्नेह अग्रेषित.

**सोबत**:- जाहिरात पृष्ठ संख्या १ ते ४

**स्थळ प्रतीवर म.अ.अ व प्रशासक यांची सही असे.**

**(मा.सु.सराफ)**
सहाय्यक अधिक्षक अभियंता
लाभक्षेत्र विकास प्राधिकरण,
जळगांव

प्रत:- मा.कार्यकारी संचालक, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव यांना माहितीस्तव सविनय सादर.

प्रत:- मा.मुख्य अभियंता, तापी पाटबंधारे विकास महामंडळ,जळगांव यांना माहितीस्तव सविनय सादर.

# लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, जळगांव

■ Email ID : cadajalgaon@gmail.com
seacada.jalgn@wrd.maharashtra.gov.in
■ दूरध्वनी : 0257- 2235880,
■ फॅक्स : 0257-2239845
■ गिरणा भवन, आकाशवाणी केंद्रासमोर,
■ आकाशवाणी चौक, जळगांव
■ Web : www.cada-jalgaon.org

**सेवा करार पद्धतीने विवक्षीत कामांसाठी सेवानिवृत्त अधिकारी यांना कंत्राटी पध्दतीवर नेमणूक करण्याबाबतची जाहिरात.**

महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/ १३ मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक मंत्रालय मुंबई ४०००३२ दिनांक.१७/१२/२०१६ मधील तरतुदीनुसार जलसंपदा विभागाच्या या प्राधिकरणांतर्गत सिंचन व बांधकाम दुरूस्तीचे अंदाजपत्रक तयार करणे दुरूस्तीचे काम करणे कार्यालयीन कामकाज सिंचन व्यवस्थापनेशी संबंधीत सर्व अहवाल पाणी वापर संस्था स्थापन करणे अस्तांतरण करणे तसेच अनुषंगीक इ. विवक्षित प्रकारचे कामकाज पार पाडण्यासाठी सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी यांची सेवा करार पद्धतीने नियुक्ती करण्यासाठी खालील पदांसाठी मान्यता मिळालेनुसार अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र | संवर्ग | पदसंख्या | अनुभव |
|---|---|---|---|
| १ | शाखा अभियंता | ९ | **क.अ./शा.अ./स.अ.श्रे.२ किंवा समकक्ष पदावर ३ वर्षांचा अनुभव** |

सदर नेमणुकीसंदर्भातील लागु असलेल्या अटी व शर्ती तसेच अर्जाचा नमुना हा महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा विभागाच्या ई-जलसेवा या वेबसाईट **https://wrd.maharashtra.gov.in** चे मुखपृष्ठावर उपलब्ध आहे.

वरीलप्रमाणे पात्रतेचे निकष पूर्ण करणाऱ्या इच्छुक उमेदवारांनी अधीक्षक अभियंता व प्रशासक,लाभक्षेत्र विकास प्राधिकरण,जळगांव. गिरणा भवन आकाशवाणी चौक,जळगाव यांचेकडे **दि. ३०/ ११ / २०२१ (सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत)** अर्ज सादर करावेत.

**(मा.सु.सराफ)**
सहाय्यक अधिक्षक अभियंता
लाभक्षेत्र विकास प्राधिकरण,
जळगांव

**स्थळ प्रतीवर म.अ.अ व प्रशासक यांची सही असे.**

**<u>सदर नेमणूका ह्या खालील सर्वसाधारण शर्ती व अटीच्या अधिन राहतील.</u>**

१. अर्ज करणा-या सेवानिवृत्त अधिकारी ज्या पदासाठी अर्ज केले आहे. त्या पदाच्या विवक्षीत कामासाठी लागणारी विशेष अर्हता व किमान तीन वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे.

२. सदर नेमणूका हया एक वर्षाच्या कालावधीसाठी आहेत.एक वर्षापेक्षा जास्त कालावधी वाढविण्याची आवश्यकता भासल्यास नियुक्ती अधिकारी शासन मान्यतेने तसा निर्णय घेऊ शकतात.

३. नियुक्त अर्जदाराला त्यांनी विहीत कार्यपालन केल्यामुळे महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२७१५/ प्र.क्र.१००/ १३ मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक मंत्रालय मुंबई ४०००३२ दिनांक.१७/१२/२०१६ मधील अटी व शर्तीप्रमाणे शासन निर्णयासोबत असलेल्या परिशिष्ट अ नुसार मासिक परिश्रमीक म्हणुन त्यांना अनुज्ञेय राहील.

४. करारपध्दतीने नियुक्ती देण्यांत आल्यामुळे संबंधीतास शासनाच्या कोणत्याही विभागात/संवर्गात सेवा

समावेशनाबाबत किंवा सामावून घेण्याबाबत वा नियमित सेवेचा इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार/हक्क नसेल याबाबत अर्जदाराने रु.१००/-च्या स्टॅम्पवर प्रतिज्ञालेख देणे बंधनकारक राहील.

५. करारपध्दतीवर नियुक्ती करण्यात येणा-या (व्यक्ती) अधिकारी त्यांच्या वयाच्या ६५ व्या वर्षापर्यंतच पदावर कार्यरत राहु शकतील.

   a. अर्ज करणा-या सेवानिवृत्त अधिकारी यांनी त्यांची शारीरीक, मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असल्याबाबत जिल्हा शल्यचिकीत्सक अधिका-याचे मुळ प्रमाणपत्र सादर करणे बंधनकाराक राहील.

६. करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अर्जदारास नेमूणक दिलेली कामे पूर्ण करण्याची जबाबदारी सबधीत व्यक्तीची राहील व तसे बंधपत्र / हमीपत्र अटी व शर्ती संबधीत उमेदवाराला मान्य आहेत ह्याबाबतचे उमेदवाराने रु.१००/-च्या स्टॅम्पपेपरवर बंधपत्र देणे बंधनकारक राहील.

७. अर्ज करणा-या सेवानिवृत्त अधिकारी विरुध्द कोणत्याही प्रकारची विभागीय चौकशी व न्यायालयीन प्रकरण चालु अथवा प्रलंबीत नसावे याबाबत अर्जदारांनी ज्या कार्यालयातुन सेवानिवृत्त झाले आहे, त्या संबंधीत कार्यालयाकडुन तसे प्रमाणपत्र देणे बंधनकारक राहील.

८. नियुक्ती प्राधिकारी यांना कोणत्याही वेळी करार पध्दतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील.

९. सदर अधिकारी त्यांच्यावर सोपविलेल्या/पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल अशा कोणत्याही कामात गुंतलेला नसावा.अशा अधिकारी यांनी Conflict of interest जाहीर करणे आवश्यक राहील.

१०. करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अधिकारी यांना आवश्यक प्रसंगी दौरा करावा लागल्यास त्यांना त्यांच्या निवृत्तीच्या वेळच्या वेतनमानास अनुसरुन प्रवास भत्ता व दैनिंक भत्ता अनुज्ञेय राहील.

११. अशा करार पद्धतीवरील अधिकारी यांनी त्यांना प्राप्त होणा-या कागदपत्रे / माहिती,कामाबाबत व आधारसामुग्री बाबत गोपनीयता पाळणे बंधणकारक राहील.

१२. नियुक्ती अधिकारी यांनी त्यांच्यावर सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पुर्ण करणे आवश्यक राहील. करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अर्जदारास नेमून दिलेले काम समाधानकारक नसल्यास कोणतेही सबळ कारण न देता त्यांची सेवा समाप्त करण्यांत येईल.

१४.अर्ज करणा-या सेवानिवृत्त अधिकारी यांनी शेवटच्या पाच वर्षाच्या गोपनीय अहवालाची प्रतवारी संबंधीत कार्यालयाकडुन प्रमाणीत करुन तसे प्रमाणपत्र सादर करावे, तसेच प्रशस्तीपत्र / नैपुण्यपूर्वक काम केले असल्यास तसे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडण्यांत यावे.

१५. क्षेत्रिय स्तरावर करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अर्जदारास सेवाकाळामध्ये काही नैसर्गीक अपघात व काही आजार उद्भवल्यास कोणत्याही परिस्थीतीत कार्यालय/शासन त्यास बांधील/ जबाबदार राहणार नाही.

१६.अर्ज करतेवेळी सेवानिवृत्त अधिकारी यांनी त्यांचे कुटूंब निवृत्तीवेतन मंजुरीचे महालेखापाल कार्यालयाचे आवश्यक दस्तऐवज सादर करावेत.

१७. करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अर्जदाराने नियुक्तीच्या ठिकाणी नियुक्ती आदेश निर्गमित झालेल्या दिनांकापासुन १५ दिवसाचे आत रुजु होणे बंधनकारक राहील अन्यथा सदर नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल.

१८.मुलाखतीकरीता पात्र उमेदवारांना पत्र ईमेलव्दारे/पोस्टाव्दारे पाठविण्यांत येईल व भ्रमणध्वनीवर लघुसंदेशाव्दारे कळविण्यांत येईल. यास्तव अर्जदारांनी आपल्या वैयक्तीक माहितीत त्यांचा ईमेल पत्ता व भ्रमणध्वनी क्रमांक देणे बंधनकारक आहे. तसेच मुलाखतीसाठी पात्र उमेदवारांची यादी अधीक्षक अभियंता, जळगाव पाटबंधारे प्रकल्प मंडळ जळगाव यांचे सुचना फलकावर रोजी प्रसिध्द करण्यांत येईल. व अंतिम निवड झालेल्या अर्जदारांची यादी वरील कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर तसेच वेबसाईटवर प्रसिध्द करण्यांत येईल. अंतीम निवड झालेल्या अर्जदारांना वैयक्तीक ईमेलव्दारे/पोस्टाव्दारे कळविण्यांत येईल.

१९.सदर नियुक्ती क्षेत्रिय स्थळावर आवश्यक सिंचन व बांधकाम कामासाठी करण्यांत येत असून त्यासाठी योग्य उमेदवार न भेटल्यास काही किंवा सर्व/समिती ठरवेल तेवढे पदे रिक्त ठेवण्याचा अधिकार समितीस आहे.

२०.करार पद्धतीने नियुक्त करण्यात येणा-या अधिका-यांस कोणत्याही प्रकारचे प्रशासकी व वित्तीय अधिकार राहणार नाहीत.

२१.उपरोक्त अटी व शर्ती व्यतीरीक्त शासन/ नियुक्ती अधिकारी वेळोवेळी ठरवतील त्या अटी व शर्ती अंतीम राहतील

**स्थळ प्रतीवर म.अ.अ व प्रशासक यांची सही असे.**

**(मा.सु.सराफ)**
सहाय्यक अधिक्षक अभियंता
लाभक्षेत्र विकास प्राधिकरण,
जळगांव